# Pashane: A Case study in IWMP Maharashtra

Smt. Pallavi Patil
Planning and Monitoring Officer
Monitoring Team, Kokan Division, Thane

Shri. Yogesh Patil
Community Mobilization Expert
Monitoring Team, Kokan Division, Thane

Pashane village falls under IWMP-17 in Taluka Karjat of District Raigad at Latitude 19° 6'33.88"N and Longitude 73°19'48.55"E. It is located 79 KM towards North from District head quarters Alibag, 22 KM from Karjat and 58 KM from State capital Mumbai. Pashane is surrounded by Karjat Taluka towards South, Murbad Taluka towards North , Ulhasnagar Taluka towards west , Panvel Taluka towards west . It is high rainfall area falling in North Konkan with annual rainfall of 3200 mm. Temperature of the area ranges between 26.4 to 31.7°C. Village is in close vicinity with nearby dam Karav.

Population of the village is about 1596. Main community of village is Kunbi. Majority of people are going to nearby city Mumbai for employment. IWMP project was started in village in 2010-11 by PIA, TAO, Karjat. Pashane watershed committee is having treatment area of 436.27 ha with cost 65.44 lakh.



**Pashane Village Board and EPA Activity**

Activities planned in village under EPA and NRM are;

| Activity | Quantity | Estimated cost (Lakh) | Actual Expenditure (Lakh) | Beneficiary Contribution (Lakh) |
|---|---|---|---|---|
| **EPA** | | **3.10** | **3.00** | |
| Solar Lamp | 3 | 0.66 | 0.66 | |
| Agricultural Library | 1 | 0.25 | 0.05 | |
| Renovation of Samaj Mandir | 1 | 1.19 | 1.19 | |
| Play equipments foe school children | 1 | 0.65 | 0.654 | |
| Catering Set | 1 | 0.35 | 0.45 | |
| **NRM** | | **37.82** | **36.65** | **1.73** |
| Mati nala Bund | 6 | 5.84 | 5.80 | 0.29 |
| | | 8.67 | 8.56 | 0.43 |
| | | 5.85 | 5.70 | 0.29 |
| | | 8.74 | 8.66 | 0.43 |
| | | 3.17 | 2.60 | 0.13 |
| | | 5.55 | 5.32 | 0.17 |

Under EPA activity Community Hall repair activity was under taken on nearby Adivasi Pada named as Kahadyancha Pada in Pashane village. Prior to this condition of community was very poor and no one was using it. After repairing people started using it for their community functions and it helped villagers on that Adivasi Pada a lot.



**Community Hall Repair under EPA**

Under Natural Resource Management Activity total six Mati Nala Bund have been constructed in village with storage capacity of 80.39 TCM. It also helped to create wage employment of 11,196 mandays. Beneficiaries contributed about 1.73 Lakh as WDF fund, which helped to create feeling of ownership among beneficiaries.



**Mati Nala Bund in Pashane village**

Due to this stored water downstream farmers have started taking double season crop (Vegetables) and more area was brought under cultivation due to availability of water. It also helps to improve Ground water level in area. Overall watershed activities done in Pashane village are proved helpful to villagers in many ways and can be a good example for other villages also.

# यशोगाथा

## वस्ती पाणी पुरवठा योजना– श्रमाची बचत

पल्लवी पाटील
योगेश पाटील
नियोजन व सनियंत्रण अधिकारी
समुह संघटन तज्ञ
विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय, कोंकण विभाग, ठाणे

रायगड जिल्हयातील कर्जत तालुक्यात एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन
कार्यक्रम सन २०१०–११ या वर्षापासुन राबविण्यात येत आहे. २०१०–११ या वर्षा कर्जत
तालुक्यात ३ प्रकल्प मंजुर झालेत. एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम
राबविण्यासाठीच्या मार्गदर्शक सुचनानुसार सदर कार्यक्रम हा लोकसहभागातुन राबवयाचा
आहे. सदर प्रकल्प नियोजनबध्द राबविण्यासाठी तिन टप्पे करण्यात आले आहेत
पुर्वतयारीचा टप्पा, आमलबजावणी टप्पा, एकत्रीकरण व बहिगर्मन टप्पा. प्रकल्पात
लोकसहभाग वाढण्यासाठी व प्रकल्पाबाबत माहीती लोकांपर्यंत पोहचण्यासाठी पुर्वतयारी
टप्यात प्रवेश प्रेरक उपक्रम राबविण्यात येतो. प्रवेश प्रेरक उपक्रमात ग्रामस्थांच्या
सदयास्थितील आडचणी सोडविणे त्यातुन एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमाबाबत
विश्वास निर्माण होवुन प्रकल्पाच्या कामात लोकसहभाग वाढेल असे अपेक्षित आहे.

कर्जत या तालुक्याच्या गावापासुन **१८ ते ३५** अंतरावर उत्तर दिशेला प्रकल्प क्र.
**१६** ची गावे आहेत. एकुण **१२ गावे** ०४ पाणलोट समितीत आहेत. सर्व पाणलोट समितीत
प्रवेश प्रेरक कार्यक्रमाची कामे पुर्ण झालेली आहेत. यामध्ये विशेषत: सौर दिवा, पिण्याच्या
पाण्याचा पाणीपुरवठा योजना दुरूस्ती, पाणी पुरवठा साठवण टाकी, शाळेला खेळणी
साहीत्य पुरवठा, सार्वजनीक कार्यक्रमासाठी स्वयंपाकाची भांडी, कृषी ग्रंथालय इत्यादी
उपक्रम राबविण्यात आले आहेत.

**पाणी पुरवठा साठवण टाकी–**

पोही हे गाव कर्जत या मुख्याल्यापासुन २० कि. मि. अंतरावर आहे.
वारे ग्रामपंचायत अंतर्गत वारे, कुरूम, मानकीवली व पोही ही ४ गावे आहेत. पोही या
गावात ७३ कुटुंब ३७२ लोकसंख्या आहे. पोही या गावात १ किलोमिटर अंतरावर
आदिवासी वस्ती आहे येथे १५ झोपडयांची वस्ती आहे. येथिल सर्व कुटुंबातील सदस्य
जवळच असलेल्या विटभट्टीवर मजुरी करतात. यापासुन एक किलोमिटरच्या परिसरात
कोणत्याही पायाभुत सोईसुविधा उपलब्ध नाहीत. या कुटुंबांचा दिवसभरातील बराचसा वेळ
प्राथमिक गरजा पुर्ण करण्यासाठी जात असल्याने त्यांना कष्टमय जिवन जगावे लागत आहे.
पिण्याच्या पाण्याची प्राथमिक सोय तेथे उपलब्ध नसल्याने त्याना पिण्याच्या पाण्यासाठी १
किलोमिटर अंतरावर पोही गावात जावुन पाणी आणवे लागत होते. विटभट्टीवर सकाळी
लवकर कामावर जावे लागत असल्याने त्यापुर्वी पाणी भरावे लागत असे किंवा संध्याकाळी
कामावरून आल्यावर पाणी भरावे लागत असे. पिण्याचे पाणी भरण्याचे काम महिलांना
करावे लागत असल्याने त्यांचा कामाचा ताण वाढलेला होता. एकात्मीक पाणलोट

व्यवस्थापन कार्यक्रम सन २०१०—११ बॅच—२ अंतर्गत या गावाची निवड करण्यात आली. गावात सुरूवातीला कार्यक्रमातील मार्गदर्शक सुचनानुसार प्रवेश प्रेरक उपक्रम राबविण्याबाबत ग्रामस्थांसोबत चर्चा केली असता सौर दिवा, पिण्याच्या पाण्याचा पाणीपुरवठा योजना दुरूस्ती, पाणी पुरवठा साठवण टाकी, शाळेला खेळणी साहीत्य पुरवठा, सार्वजनीक कार्यक्रमासाठी स्वयंपाकाची भांडी, कृषी ग्रंथालय इत्यादी उपक्रम गावात राबविण्याबाबत निश्चित करण्यात आले त्यावर ग्रामसभेत चर्चा करून ग्रामसभेने प्रवेश प्रेरक उपक्रमांना मंजुरी दिली.

पोही गावातील अदिवासी वस्तीवर आडचणी लक्ष्यात घेवुन प्रवेश प्रेरक उपक्रम अंतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी पाणीपुरवठा योजना करण्याचे ठरले. उपक्रम राबविण्याबाबत ग्रामस्थांसोबत चर्चा केली असता पाण्याचा बोअर, पंप, पाईप इत्यादी खर्च ग्रामस्थांनी लोकवर्गणीतुन करण्याचे ठरले. एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातुन २००० लिटर क्षमतेची सिंटेक्स टाकी व चौथरा बांधुन देण्याबाबत ठरले. यासाठी अंदाजपत्रीय रक्कम १,१०,७३४ रूपयेचा आराखडा तयार करून मंजुर करण्यात आला. वस्तीवर पाणी पुरवठा योजना राबवितांना ग्रामस्थांनी सहभाग घेतला त्यामुळे सर्व कामे वेळेवर पुर्ण झालेत.



पोही येथे आदिवासी वस्तीवर पाणी भरतांना महिला. १९०५'२४.२० एन. ७३'२३'०८.२० ई

पोही येथील अदिवासी वस्तीला भेट दिली पाणी साठवण टाकीबाबत ग्रामस्थांसोबत चर्चा केली असता "वस्तीत पाणी साठवण टाकी झाल्यापासुन सर्व घरांना २४ तास पाणी पुरवठा होत आहे. तसेच वस्तीत पाणी उपलब्ध झाल्याने पाणी भरण्यासाठी लागणाऱ्या वेळेची बचत होत आहे" असे वस्तीतील महिलांनी सांगितले. सर्व वस्तीला पुरेसे आणि स्वच्छ पाणी उपलब्ध झाले आहे त्यामुळे आरोग्याचा प्रश्न सुटण्यास मदत होत आहे.

देखभाल दुरूस्ती– पोही येथिल वस्तीत पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरूस्ती वस्तीतील लोक करतात. विजे बिल, किरकोळ दुरूस्तीसाठी वस्तीतुन वर्गणी जमा केली जाते व भुऱ्या बुध्या हिलम या व्यक्तीवर सकाळी व संध्याकाळी पाण्याची साठवण टाकी भरण्याची व लोकवर्गणी जमा करण्याची जबाबदारी ग्रामस्थांनी दिलेली आहे. पाणी पुरवठा योजनेची किरकोळ दुरूस्ती वेळच्या वेळी होत असते. वस्तीतील सर्वांनी पुरेसे आणि स्वच्छ पाणी मिळते तसेच पाणी भरण्यासाठीचे श्रम कमी झाल्याने वस्तीतील सर्वांनी समाधान व्यक्त केले.